# ECHO OF HIS CALL

# बोलाविण्याचा प्रतिध्वनी

MARATHI

ECHO OF HIS CALL 1969-2019 GOLDEN JUBILEE REACHING NATIONS

India's National Spiritual Newspaper

₹ 10/-

Published monthly in ENGLISH, TAMIL, MALAYALAM, TELUGU, HINDI, KANNADA, MARATHI, BENGALI, GUJARATI, ODIYA, ASSAMESE, PUNJABI, NEPALI, URDU, SINHALA & AFRIKAN

Editor : S. SAM SELVA RAJ | 16 Languages | Associate Editor : Rev. SHASHI TIWARI

VOL: XXVI YEAR OF OUR LORD JESUS CHRIST, 2024 APRIL No. 03


## पवित्र शास्त्र

कृपया हा शास्त्र भाग पाठ करा

गीतशास्त्र ३४:१-१०

१. परमेश्वराचा धन्यवाद मी सर्वदा करीन; माझ्या मुखांत त्याचे स्तवन सतत असेल.

२. माझा जीव परमेश्वराच्या ठायी प्रतिष्ठा मिरविल, दीन हे ऐकून हर्ष करितील.

३. तुम्ही मजबरोबर परमेश्वराची थोरवी गा; आपण सर्व मिळऊन त्याच्या नामाची महती वर्णू या.

४. मी परमेश्वराला शरण गेलो आणि तो मला पावला; त्याने माझ्या सर्व भयांपासून मला सोडविले.

५. ज्यांनी त्याजकडे पाहिले ते प्रकाश पावले; त्यांची मुखें लज्जेंनें कदापी काळवंडणार नाहीत.

६. या पामरानें धावा केला आणि परमेश्वरानें तो ऐकला; त्याने त्याच्या सर्व सर्व संकटांतून त्याला सोडविले.

७. परमेश्वराचा दिव्यदूत त्याचे भय धरणाऱ्यां भोवती छावणी देतो आणि त्यांचे संरक्षण करितो.

८. परमेश्वर किती चांगला आहे याचा अनुभव घेऊन पाहा; त्याजवर भाव ठेवितो तो पुरुष धन्य!

९. परमेश्वराचे पवित्र जनहो, त्याचे भय धरा, कारण त्याचे भय धरणाऱ्यांस काही उणे पडत नाही.

१०. तरुण सिंहासहि वाण पडते व त्याची उपासमार होते; पण परमेश्वराला शरण जाणाऱ्यांस कोणत्याहि चांगल्या वस्तूची वाण पडत नाही.

# तुम्हांस मुक्त करणारा एक तारणारा आहे!

*बहीण जेसी वीणा सॅम*



आपला प्रभु, जो आपला उद्धारक देखील आहे, तो या दिवसात आपले मार्गदर्शन करीत आहे. जुन्या करारातील काळात यांच देवाने लोकांची आरोळी ऐकली, त्यांच्या विनंत्या ऐकल्या, त्यांचा धोक्यापासून बचाव केला आणि त्यांना मुक्ती दिली. त्याने एकेका व्यक्तिच्या द्वारे काही लोकांची कशी सुटका केली हे पाहू या.

## १. मोशे

सर्व प्रथम इस्त्राएलच्या लोकांची कोणत्या परिस्थितीतून, आणि कशा रितीने सुटका केली ते तपासून पाहू या. मोशेच्या जन्माविषयी निर्गम पुस्तकाच्या २ऱ्या अध्यायात आपल्याला वाचावयास मिळते.

योसेफामुळे इस्त्राएल लोकांनी मिसरात सुरवातीला स्वातंत्र्य उपभोगिले. परंतु त्यानंतर त्याच मिसर देशात ते गुलाम बनले, आणि भयंकर असा छळ आणि दु:ख सहन करावे लागले. त्यांना त्यांच्या चुका कळून आल्या आणि त्यांनी देवाकडे आक्रोश केला.

परमेश्वराने अब्राहामाला भाकीत केले होते कि इस्त्राएलचे लोक ४०० वर्षे मिसर देशात

(...पान ३ वर)




एको ऑफ हिज कॉल पाच मिनिटांचा संदेश

यू ट्युब ख्रिश्चन चॅनल

पास्टर सॅम सेल्वा राज

यांच्या सोबत प्रार्थनेत सहभागी होण्याची संधी


इंग्रजी, हिन्दी, तमिळ आणि तेलगु

Every day – From 2.00 A.M.

प्रतिदिनी - पहाटे पाच वाजता रविवारची तमिळ भक्ति - ८.३० सकाळी

ECHO OF HIS CALL - (1969-2019 GOLDEN JUBILEE YEAR)

REACHING NATIONS



## तुमच्या अतिप्रिय बंधु कडून...



### “...परमेश्वर तुझा रक्षणकर्ता होईल, तो तुझा पाय गुंतू देणार नाही”
(नीतिसूत्र ३:२६)

### आमचे कार्याविषयीचे धोरण

आम्ही समकालीन पीढीला पुरातन आणि आरंभीच्या प्रेषितांची शिकवण तीची प्रखरता कमी न करता स्पष्ट करावी आणि शिकवावी ही काळाची गरज आहे.

HON. EDITOR-IN-CHIEF
Rev. Angeline S. Kumari, M.A., M.Sc., M.Ed.
HON. MANAGING EDITOR
Pastor Alex Samson Sam, B.Th., M.Div.
GENERAL MANAGER
Bro. N. Prakasam, M.A., M.Sc.(C&P), PGDHRM., MBA.
ADMINISTRATION
Sis. Jesy Veena Sam
Adv. K. Puratchivendan, M.Com., C.A., B.L.
Dr. P.E.R. Premchand, M.Sc., M.A., M.Ed., Ph.D.
Dr. C.G.S. Baburao, B.Tech., M.Tech. (DM), Ph.D.
Dr. Rabinder Boaz, M.S. (CMC)
EDITORIAL BOARD
Dr. Serena Bevin, M.A., M.Phil., B.Ed.
Sis. Sajini Cherian
Sis. L. Mariya Anjalin, M.A., M.Sc., B.Ed.
Rev. Dr. K.R. Rajasekaran

EDITOR, PUBLISHER & PRINTER
Pastor S. SAM SELVA RAJ
Echo of His Call Printers
10, Mohammed Abdullah 2nd Street,
Chepauk, Chennai- 600 005, India.
Phone : (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766
Cell : (+91) 98410 71852, 98412 71858
95661 31858
E.MAIL
sam@echoofhiscall.org
biblecor@yahoo.co.in
WEBSITES
www.echoofhiscall.org
www.stpaulsmatriculation.com
YOUTUBE CHANNEL
Echo of His Call

ख्रिस्तामधील प्रिय बंधुंनो आणि बहिणींनो,

आपल्या प्रभु आणि तारणाऱ्या येशू ख्रिस्ताच्या गौरवी नामात प्रेमळ शुभेच्छा.

आम्हाला १६ भाषांमध्ये प्रसिद्ध होत असलेल्या **एको ऑफ हिज कॉल** मासिक चार भाषांमधील **एको ऑफ हिज कॉल** यूट्युब चॅनल, ३ भाषांमधील **पायाभूत बायबलकोर अभ्यासक्रम,** दोन भाषांमधील पत्रव्यवहारा द्वारे करण्यात येत असलेला **थियॉलॉजीकल अभ्यासक्रम,** तीन वेगवेगळ्या स्थानात असणाऱ्या **नहेम्या बायबल कॉलेज,** गावातील **सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कुल,** मुख्य आणि शाखा मंडळ्या, अशा आमच्या भिन्न-भिन्न सेवाकार्या द्वारे आम्हाला प्राप्त होत असलेल्या उस्त्फूर्त प्रतिसादामुळे आम्ही अतिहर्षित होत आहोत. आम्ही जगभरात सुवार्ता प्रसार करण्यात सक्रिय आहोत. तुमच्या पाठींब्याला आणि दयाळूपणाला आम्ही दाद देत आहोत. आणि तुमच्या प्रतिसादाची आतुरतेने वाट पाहत आहोत.

२ मार्च २०२४ रोजी आमच्या **सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कूल**चा वार्षिक दिन यशस्वीरित्या पार पडला; हे तुम्हा सर्वांना कळविण्यात आम्हाला आनंद होत आहे. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी त्यांच्या कलांचे उत्तम सादरीकरण केले, जे उपस्थित पालकांना, लेकरांना आणि शाळेच्या जवळपासच्या रहिवाशांना आवडले. तो कार्यक्रम एखाद्या सभा आणि आरोग्यदान सभासारखाच होता, आणि आम्ही तुम्हा सर्वांच्या सततच्या प्रार्थनाबद्दल ऋणी आहोत.

आम्ही ३ मार्च २०२४ या दिवशी सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कूलच्या प्रांगणात लेकरांची आणि तरुणांची विशेष रॅली आयोजीत केली होती. ज्यामध्ये विशेष गीते, साक्षी आणि संदेश




*Annual Day of St. Paul's Matriculation School*

समाविष्ट होते. या रॅलीला १०० लोकांची उपस्थिती होती.

आम्ही प्रत्येक रविवारी मंडळीच्या उपासनेनंतर तरुण लेकरांची भेट घेत असतो. त्यांची देवाच्या मार्गाने वाढ करीत असतो. आम्हाला **सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कूल** आणि **नहेम्या बायबल कॉलेज** करिता आणखीन विद्यार्थी, तामिळ आणि हिन्दी भाषिक, उत्तम शिक्षक आणि पुढारी हवे आहेत. त्याशिवाय आमच्या १६ भाषांमध्ये प्रसिद्ध होत असलेल्या. **एको ऑफ हिज**

**Our Ministries:** ECHO OF HIS CALL Monthly Magazines (16 languages) ✿ BIBLECOR - Postal Courses (3 languages) ✿ YouTube Ministry ✿ Online Courses ✿ Theological Correspondence Courses (2 languages) ✿ Church Planting ✿ Nehemiah Bible Colleges ✿ Gospel Printing Press ✿ Great Commission Partners ✿ St. Paul's Matriculation School ✿ Crusades ✿ Community Development



***Children and Youth Rally***



***Prayer for students appearing Public Examination***

**कॉल** मासिककरिता आणखीन वाचक हवे आहेत. तेव्हा आम्हाला तुमच्या मित्र मंडळींचे पत्ते, फोन क्रमांक आणि भाषा कळवा, म्हणजे आम्ही त्या सर्वांना त्यांच्या भाषेतील मासिक प्रत्येक महिन्याला विनामुल्य पाठवीत जावू. उर्दु भाषिक मासिकाकरीता देखील वाचक हवे आहेत. तुमच्या छोटा-मोठ्या प्रमाणातील सहकार्याबद्दल आम्हाला आनंद होईल आणि देव त्याबद्दल तुम्हाला प्रतिफळ देईल.

जगभरातील सर्व देशांमध्ये शांतता नांदावी आणि उत्कर्ष व्हावा यासाठी आम्ही नित्य नियमाने प्रार्थना करीत आहोत. विशेषत: भारतात आत्मिक उत्कर्ष व्हावा याकरीता प्रार्थना करीतो. तुमच्यावर, तुमच्या कुटुंबियांवर आणि तुमच्या देशावर आशीर्वादांची वृष्टि करावी अशी देवाजवळ विनंती करीत आहोत.

आमचे **नहेम्या बायबल कॉलेजचे** सर्व शिक्षक महिन्यातून एक दिवस रेव्ह. एम्. मुथ्थु -अध्यक्ष आणि नव्याने सामील झालेले प्रिन्सिपल रेव्ह. जे. जॉन राजरतनम यांच्या



***Nehemiah Bible College Board Meeting***

नेतृत्वाखाली कॉलेजच्या वाढी संबंधात आणि नियमित कार्यक्रमांसंबंधात चर्चा करण्यास एकत्र येत असतात.

तुमचे ईमेल, पत्र, फोन आम्हाला आत्मिक संघर्षात पुढे-पुढे जात राहण्यास बळ देतात. आणि ते सर्व प्रभुमध्ये मनात बाळगतो. आमच्या कार्यालयीन स्टाफ, मंडळीतील सभासद, सर्व सह-संपादक, पाळक वर्ग, सुवार्तिक, शब्बाथ शाळेतील विद्यार्थी, गावातील शाळा, बायबल कॉलेज, मुद्रणालयातील स्टाफ, आणि आमच्या कर्माचरी वर्गातील अनेक जण आजारी आहेत. अशा सर्वांकरिता तुमच्या विशेष प्रार्थनांची आम्हाला गरज आहे.

देव तुमहा सर्वांना विपुल आशीर्वाद देवो.

ख्रिस्त येशू मध्ये तुमचे दास.

**पास्टर एस्. सॅम सेल्व राज आणि**
**ॲलेक्स सॅमसन सॅम**

(+91) 9841271858/9841071858
E-mail : sam@echoofhiscall.org

★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★

## त्याच्या बोलाविण्याचा प्रतिध्वनी मासिकाच्या वाचकांनो – लक्ष द्या

**एको ऑफ हिज कॉल** यूट्युब चॅनलवर आमचे ५ मिनिटांचे मननपर संदेश दररोज पहाटे २.०० वाजता तामिळ, तेलगू, इंग्रजी आणि हिन्दी या भाषांमध्ये प्रसारीत केले जात आहेत. संदेश ऐकून तुम्ही देवाची कृपा प्राप्त करु शकता.

आणखी माझे मोबाईल क्रमांक (+९१)९८४१०७१८५८, आणि (९१)९८४१२७१८५८ (वैयक्तिक) तुमच्या मोबाईलमध्ये जतन करुन ठेवा.

**- पास्टर एस्. सॅम सेल्वा राज**

★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★

(पान १ वरुन...)

दास्यात राहतील (उत्पत्ति १५:१३) आणि उत्पत्ति १५:१६ भविष्य केले होते, ''तुझ्या चौथ्या पिढीचे लोक इकडे माघारे येतील'', देवानें दिलेल्या अभिवचनाला अनुसरून इस्त्राएलांचा आकांत ऐकला.

यातना सहन करण्याकरीता त्यांनी विनंती केली, ''हे प्रभु! आम्हावर दया कर आणि आमची फारोच्या दुष्ट हातांतून सुटका कर. आमच्या पूर्वजांना दिलेल्या अभिवचनानुसार दुध, मध वहात असलेला कनान देश आम्हाला केव्हा प्राप्त होणार? आमच्या देवाची उपासना आणि अर्पणे मोकळेपणानें केव्हा करू शकणार?''

देव जो त्याच्या लोकांची परिक्षा घेतो, परंतु त्यांच्या शक्तिपलीकडे कधीही नाहि, त्याने त्यांचा आकांत ऐकला. त्यांच्या हेकेखोर प्रवृत्तीची पर्वा न करीता, ज्या वेळी इस्त्राएल लोकांनी पश्चाताप केला देवाला दयेची याचना केली, त्याच्या प्रेमळ हृदयानें त्यांचे ऐकले आणि दया दर्शविली.

फारोच्या शक्तिशाली हातातून इस्त्राएलांची सुटका करण्याकरिता देवाने मोशेला निवडीले होते. मोशे, त्याच्या मातेच्या उदरात असतानाच सोडविणारा/उद्धारकर्ता म्हणून वेगळा केला गेलेला (स्तोत्र १३९:१६). मिसरात दोन वर्षांखालील

नर बालकांनी मारुन टाकल्याची आज्ञा करण्यात आली असताना मोशेचे अद्भूत रित्या रक्षण झाले होते. तीन महिन्यांचा होई पर्यंत त्याच्या आईने त्याला लपवून ठेविले, पुढे त्याला लपवून ठेविता येईना म्हणून तिने लव्हाळ्यांचा एक पेटारा करून त्यांत त्या बालकास घालून नदिच्या पात्रात सोडून दिले. असे म्हटले जाते त्या नदित पुष्कळ मगरी होत्या.

राजपुत्राप्रमाणे फारोच्या राजमहालात मोठा झाल्या नंतर एका मिसरी व्यक्तिला ठार मारून, तो इब्री आहे हे समजल्यामुळे मिद्यान देशात पळून गेला. मोशे ४० वर्षे मिद्यानात मेंढपाळ म्हणून असताना देवाने त्याला जवळ केले व दर्शन दिले.

मोशला एक झुडूप अग्नीनें जळत असून ते भस्म झाले नाही असे दिसले. आणि हा काय चमत्कार आहे हे पाहाण्यासाठी तिकडे गेला. परमेश्वरानें तो वळल्याचे पाहिले, आणि झुडपांतून हांक मारुन म्हटले, **मोशे, मोशे मी इस्राएल लोकांचा आकांत ऐकला आहे. तर आता चल, इस्राएल वंशज यांस बाहेर काढावे म्हणून मी तुला फारोकडे पाठवितो. त्याच्याशी तू बोल म्हणजे तो इस्राएलांस सोडील व तूं त्यांना कनान देशात घेऊन जा, जो देण्या विषयी अब्राहाम आणि इसहाक यांस अभिवचन दिले होते. ते काम तुजवर सोपवितो.**

प्रथम: मागे-पुढे करत मोशेने प्रश्न विचारीले, लोकांच्या अविश्वासाबद्दल चिंता व्यक्त केली, मी वक्ता नाहि, मुखाचा व जिव्हेचाहि जड आहे अशी कारणे पुढे केली. त्याने तशी नकारार्थी इच्छा प्रदर्शीत केली असताना देखील देवाने त्याला आश्वासन देवून म्हटले, ''तूं फारोकडे जा मी तुजबरोबर आहे. तुझा भाऊ अहरोन यास तुज बरोबर घेऊन जा आणि बोल.''

अनेक वेळा मोशे प्रमाणे, आपणांस देखील देव एका विशीष्ठ मार्गाने मार्गदर्शन करीत असतो किंवा स्वार्थीपणाने करीत असलेल्या कृतीस मज्जाव करीत असतो अशी अनेक कारणे पुढे करीत असतो.

मोशेने सरतेशेवटी इस्राएल लोकांची दास्यातून सुटका करण्या विषयीची देवाची आज्ञा मान्य केली. आपल्या मित्राशी भाषण करावे तसे परमेश्वर मोशेशी बोलला (निर्गम ३३:११). देवाने निवड केलेल्या मोशेने चमत्कार अद्भूत कृत्ये करीत लोकांना मिसरामधून तांबड्या समुद्रांतून बाहेर काढले.

आपल्याला हे निर्गमाच्या पहिल्या चौदा अध्यायात वाचावयास मिळते. देवाने फारोला इस्राएल लोकांची त्याने सुटका केल्या नंतर त्यांचा पाठलाग करू दिले. मिसरात ४३० वर्षे (चार पिढ्या) गुलामीत राहिल्यानंतर, समोर तांबडा समुद्र, मागे पाठलाग करणारा फारो आणि त्याचे सैन्य आणि दोन्ही बाजूंना पर्वत अशा पूर्णपणे वेढल्या गेलेल्या स्थितीत इस्राएलांनी परमेश्वराचा धावा केला.

मोशे दैवी मार्गदर्शनाची अपेक्षा करीत असताना, देवाने त्याला तांबडा समुद्र दुभागण्याची सूचना केली. मोशेने आपला हात समुद्रावर उगारला आणि पाणी उजवीकडे व डावीकडे भिंतीसारखे दुभाग होऊन मध्ये कोरडी जमीन झाली. व इस्राएल लोक कोरड्या जमिनीवरुन चालत गेले. पाठलाग करणारे सैन्य समुद्रात गडप झाले, त्यातला एकहि वाचला नाही. परमेश्वराने मिसऱ्यांना आपला प्रबळ हात दाखविला.

अशा रितीने मोशेने उद्धारकासारखी कृति करुन देवाच्या लोकांची समुद्र दुभागून सुटका केली.

## २) अथनिएल

शास्ते ३:१-११ या वचनांत नमूद केल्याप्रमाणे, देवाची आश्चर्यकारक कृत्ये पाहिली असून देखील इस्राएल लोक कनान देशात देवाला विसरले आणि अन्य देवांची उपासना करू लागले. इस्राएलांवर परमेश्वराचा कोप भडकला आणि त्याने त्यास मेसो पटेम्याचा राजा कुशन-रिशाथईम याच्या दास्यात आठ वर्षे ठेविले.

ज्या लोकांनी पाप केले. त्यांनी परमेश्वराचा धावा करताच त्यांचा ''केवळ क्षणभर मी तुला सोडिले, तरी मोठ्या करुणषने मी तुला जवळ करीन'' या यशया ५४:७ वचनात अभिवचन दिल्यानुसार त्यांच्या करीता एक सोडविणारा पुरविला. '' इस्राएल लोकांनी परमेश्वराचा धावा केला तेव्हां त्याने त्यांच्याप्रीत्यर्थ

(...पान ६ वर)


NEHEMIAH BIBLE

RESIDENTIAL / EVENING COLLEGE,

Velachery / Chepauk & Santhoshapuram, Chennai.

Medium : Hindi / Tamil

Registered Candidate for Membership

Asia Theological Association (ATA)

Recognised by International Christian Leaders & Senior Pastors for the past 54 years

Qualification : 10th Standard & above

Certificate in Ministry

Diploma in Theology

Rush for admission!

Contact : The Chairman, Nehemiah Bible College.

10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA.

Phone : (+91-44) 2852 8282, Cell : (+91) 98410 71852 / 95661 31858

E.mail : sam@echoofhiscall.org / Website : www.echoofhiscall.org

★ ONLINE CLASSES ARE AVAILABLE ★

GREAT COMMISSION PARTNERS
ECHO OF HIS CALL MINISTRIES SINCE 1969

# महान सेवाकार्याचे भागीदार प्रार्थना विनंत्या

ओझी वाहाणे (गलती ६:२),
गरजा भागविणे (रोम १२:१३),
आणि कार्यास गती देणे (२ तिमथी १:६)

स्तुति आणि प्रार्थनेचे मुद्दे १९ एप्रिल ते १८ मे २०२४ पर्यंत

(कृपया हे पान बाजूला काढून, सतत प्रार्थना करण्याकरिता तुमच्या पवित्र शास्त्रात ठेवा)

## ✞ याकरीता देवाची स्तुती करा...

**१९ एप्रिल** : शुभवर्तमान न पोहचलेल्या विविध भाषिक लोकांपर्यंत ते **एको ऑफ हिज कॉल** युटूब माध्यमातून पोंहचविण्याच्या सेवे वरील आशीर्वादाबद्दल.

**२० एप्रिल** : **सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कूल, नहेम्या बायबल कॉलेज** आणि **पत्र व्यवहाराद्वारे** करण्यात येत असलेल्या **बायबल अभ्यासक्रमावर** असलेल्या त्यांच्या आशीर्वादा बद्दल.

**२१ एप्रिल** : **एको ऑफ हिज कॉल**च्या सर्व स्टाफ आणि त्यांच्या कुटुंबियांचे रक्षण करीत असल्याबद्दल.

**२२ एप्रिल** : आमच्या सर्व प्रार्थना भागीदार, वर्गणीदार, विश्वासातील भागीदार, आजीवन भागीदार आणि महान आज्ञापालनातील भागीदार व त्यांच्या कुटुंबियांवर दर्शवित असलेल्या दया दृष्टी बद्दल.

**२३ एप्रिल** : २ मार्च २०२४ रोजी संपन्न झालेले **सेंट पॉल्स् मॅट्रीक्युलेशन स्कूल**चे वार्षिक सम्मेलन आशीर्वादीत केल्याबद्दल.

**२४ एप्रिल** : ३ मार्च २०२४ रोजी परिक्षांर्थी करीता आणि तरुणामधील कार्या करीता आयोजीत केलेली प्रार्थना सभा आशीर्वादीत झाल्याबद्दल.

**२५ एप्रिल** : तरुणांना मंडळीच्या कार्यक्रमात उत्साहाने सहभागी होण्यास उत्तेजन देऊन त्यांना आशीर्वादीत करीत असल्याबद्दल.

**२६ एप्रिल** : **सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कूल**च्या १०वी च्या विद्यार्थ्यांना शासकीय परिक्षा पूर्ण करण्यास यश दिल्याबद्दल.

**२७ एप्रिल** : आम्ही आमच्या सर्व मंडळ्यां, शब्बाथ शाळा, तरुण वर्ग आणि शालेय सेवा कार्यावर आशीर्वादाची मागणी करीत आहोत.

**२८ एप्रिल** : **नहेम्या बायबल कॉलेज**ला मान्यता देण्याच्या उद्देशाने A.T.A. (एशिया थियॉलॉजीकल असोशिएशन) V.E.T. (व्हिझीटींग इव्हॅल्युएशन टीम) संघाची भेट आशीर्वादीत व्हावी.

**२९ एप्रिल** : सर्व प्रकारच्या दुष्ट शक्तिंपासून आमचे वरिष्ठ पाळक पास्टर एस्.सॅम. सेल्वाराज आणि त्यांच्या कुटुंबियांचे रक्षण करीत असल्याबद्दल.

**३० एप्रिल** : आमच्या मुद्रणालयात १६ भाषांमध्ये, प्रसिद्ध पत्रिकांचे मुद्रण करुन ती मिशनक्षेत्रांमध्ये पाठविण्यास आशीर्वादीत करीत असल्याबद्दल.

**०१ मे** : २०२३-२०२४ हे आर्थिक वार्षिक वर्ष आशीर्वादित केल्याबद्दल.

**०२ मे** : आमच्या सर्व सहसंपादक, समन्वयक आणि त्यांच्या कुटुंबियांबद्दल.

**०३ मे** : मिशन क्षेत्रांतील सेवकांच्या समर्पितपणाबद्दल.

**०४ मे** : अतिशय भयंकर अशा जागतिक हवामान स्थितीमध्ये सुरक्षिततेचे कवच घालून रक्षण करावे.

## ✞ कृपया यासाठी प्रार्थना करा...

**०५ मे** : या जगात आपल्या लेकरांना निस्वार्थीपणे वाढविणाऱ्या मातांकरीता.

**०६ मे** : देवाने इस्राएल, पॅलेस्टाईन, युक्रेन आणि रशियामध्ये शांती पूर्ववत प्रस्थापीत करावी.

**०७ मे** : आमच्या वरिष्ठ पाळकांना त्यांचे आत्मचरित्र यशस्वीरीत्या पूर्ण करता यावे.

**०८ मे** : नवीन आर्थिक वर्षाकरिता देवाच्या दैवी मार्गदर्शनाकरीता.

**०९ मे** : पास्टर जॉनी यांच्या दु:खी कुटुंबाच्या दैवी सांत्वनाकरीता.

**१० मे** : मुद्रणालयाच्या दैनदीन मुद्रणकार्या करीता.

**११ मे** : A.T.A. द्वारे मान्यता प्राप्त होणाऱ्या कार्याकरीता.

**१२ मे** : संस्थेमधील कर्मचाऱ्यात सुसंवाद आणि ऐक्य असावे.

**१३ मे** : १ जून २०२४ रोजी होणारा **नहेम्या बायबल कॉलेज**चा कार्यक्रम यशस्वी व्हावा.

**१४ मे** : २०२४-२५ या शैक्षणीक वर्षाकरीता **नहेम्या बायबल कॉलेज** मध्ये निवासी आणि सायंकालीन आभ्यासक्रमाकरीता प्रवेशाकरीता योग्य पात्र विद्यार्थी मिळावेत.

**१५ मे** : सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कूल मध्ये २०२४-२५ या शैक्षणीक वर्षाकरिता प्रवेशा करीता विद्यार्थी मिळावेत.

**१६ मे** : जगभरातील दवाखान्यामध्ये पुष्कळ दिवसांपासून उपचार घेत असलेल्या आणि ठराविक कालावधीसाठी उपचार घेत असलेल्या आजरी व्यक्तिकरीता.

**१७ मे** : देशांना देवाचे भय असणारे पुढारी देऊन आशीर्वादीत करावे.

**१८ मे** : सेवा संस्था आणि सेवकांवरील क्रुर कृत्यांचा अंत व्हावा.

(पान ४ वरुन)

कालेबाचा धाकटा बंधु कनान याचा पुत्र अथनिएल, ह्यास सोडविणारा म्हणून योजिले आणि त्याने त्यांची सुटका केली. त्याजवर परमेश्वराचा आत्मा उतरला व तो इस्त्राएलाचा शास्ता झाला; तो लढाईस निघाला तेव्हा परमेश्वराने मेसेपटेम्याचा राजा कुशन-रिशाथईम यास त्याच्या हाती दिले व त्याजवर त्याचे वर्चस्व झाले.'' (शास्ते ३:९-१०) त्यानंतर चाळीस वर्षे देशास स्वास्थ्य प्राप्त झाले. देवाने अथनिएल याची सोडविणारा या नात्याने नेमणूक करून त्या समयी इस्त्राएलांची कशी सुटका केली ते पहावयास मिळते.

## ३) गीदोन

आता आपले लक्ष गीदोनकडे वळवू या. इस्त्राएल लोकांनी परमेश्वराच्या दृष्टीने जें वाईट तें पुन: केले, तेव्हा परमेश्वराने त्यांस सात वर्षे मिद्यानाच्या हाती दिले.'' (शास्ते ६:१)

मिद्यानाचा हात इस्त्राएलावर प्रबळ झाला; मिद्यानाच्या भीतीनें इस्त्राएल लोकांनी डोंगराडोंगरांतून आपणांस राहावयासाठी विवरे, गुहा व दुर्ग तयार केले. लोकांनी शेते पेरल्यावर मिद्यानी, अमालेकी आणि पूर्वदेशस्थ लोक त्यांच्यावर हल्ला करीत, अन्न, शेरडेमेंढरे, काहीएक शिल्लक राहू देत नसत. ते टोळधाडी प्रमाणे येत. (शास्ते ६:२, ४:-५). त्याच्या या दुर्दशेत त्यांनी देवाचा धावा केला. तेव्हा परमेश्वराने इस्त्राएलाकडे त्यांना त्याने मिसर देशातून काढून आणिले, दास्यगृहांतून बाहेर आणिले. यांची आठवण देण्याकरीता एक संदेष्टा पाठविला आणि त्यांनी अमोऱ्याच्या देवाचे भय बाळगू नये असे सांगितले. (शास्ते ६:८-१०).

जेव्हा त्याच्या लोकांनी सन्मार्ग सोडला, त्याच्या धाव्यामुळे परमेश्वर त्यांना सोडविण्याकरीता एका निवडलेल्या व्यक्तिला पाठविण्याकरीता तयार झाला.

आपण देखील देवाचा आवाज ऐकण्यास चुकतो; परंतु त्रासात पडल्यावर मात्र त्याने कृपा करावी आपली सुटका करावी यासाठी त्याचा धावा करीतो.

इस्त्राएलांची सुटका करण्याकरीता देवाने एक दूत पाठविला, तो अफ्रा येथे येऊन अबियेजरी याच्या एका वृक्षाखाली बसला. योवाश याचा पुत्र गिदोन मिद्यान्यांपासून बचाव व्हावा म्हणून द्राक्षकुंडात गव्हाची मळणी करीत होता. त्यास परमेश्वराच्या दूताने दर्शन देऊन म्हटले, हे बलवान वीरा, परमेश्वर तुझ्याबरोबर आहे. गिदोन त्यास म्हणाला. परमेश्वर आमच्या बरोबर असून आम्हांवर ही सर्व विपत्ति येऊन कां पडावी? परमेश्वराच्या अद्भूत कृत्यांविषयी आमचे वाडवडील आम्हांस सांगत आले, ती कृत्ये आता कोठे गेली?

इस्त्राएल लोकांस मिंद्यानांपासून सोडविण्याची कामगीरी देवाने गीदोनावर सोपविली; परंतु मोशेप्रमाणेच ती स्विकारण्यास अनिच्छा प्रगट केली, कारणे पुढे केली. तरी सुद्धा परमेश्वर त्याला म्हणाला, **''मी तुझ्या बरोबर राहीन, मिद्यानी लोकांचा संहार, जसा एका पुरुषाचा करावा तसा तूं करिशील.''** (शास्ते ६:१५-१६).

तरी देखील विश्वास ठेवण्यास तो तयार नव्हता, त्याने पुन: चिन्ह मागितले. अनेक चिन्हे पाहिल्यानंतर मात्र गिदोन आणि त्याचे लोक मिद्यान्यांशी लढण्यास तयार झाले.

परमेश्वराने गिदोनास म्हटले, जर संख्येनें पुष्कळ लोक घेऊन विजय मिळविला तर इस्त्राएल म्हणतील आमच्या भुजबळाने बचाव झाला. देवाने त्याला केलेल्या मार्गदर्शनानुसार त्याने लोकांची परिक्षा घेतली व केवळ ३०० लोकांची निवड करुन बाकीच्यांना आपआपल्या ठीकाणी माघारी पाठविले. (शास्ते ७:८).

मद्यानी खाली खोऱ्यात छावणीत होते. तेथे जाण्यास त्याला सांगण्यात आले. ''मिद्यानी, अमालेकी व पूर्व देशस्थ लोक टोळप्रमाणे अगणित असून त्या खोऱ्यात पसरले होते. त्यांचे उंट समुद्रतीरीच्या वाळूप्रमाणे अगणित होते. (शास्ते ७:१२).

गिदोन तेथे गेला तेव्हा एकजण सोबत्यास स्व:ता पाहिलेले स्वप्न सांगत होता, ''एक सातूची भाकर लोटत लोटत मिद्यानाच्या छावणीत गेली व तिने डेऱ्यास असा धक्का दिला की तो पडला.'' (शास्ते ७:१०-१३).

गिदोनानें तीनशे पुरुषांच्या तीन तुकड्या केल्या; त्या सर्वांच्या हाती त्याने रणशिंगे व रिकामे घडे दिले, त्या घड्यांच्या आत दिवट्या ठेविल्या. **''त्या तिन्ही तुकड्यांनी रणशिंगे फुंकून घडे फोडून टाकिले आणि आपल्या डाव्या हाती दिवट्या आणि उजव्या हाती फुंकावयासाठी रणशिंगे घेऊन त्यांनी परमेश्वराची तरवार, गिदोनाची तरवार असा घोष केला.''** (शास्ते ७:२०).

प्रथेनुसार शस्त्रे हातात नसताना देखील केवळ रणघोषाने शंत्रू घाबरुन पळून जाऊ लागले आणि परमेश्वराने प्रत्येक माणसाची तरवार त्याच्या सोबत्यावर व सर्व सेनेवर चालविली. (शास्ते ७:२२) देवापासूनच प्राप्त झालेल्या भेटीमुळे गिदोन हा इस्त्राएलाचा सोडविणारा स्थापित झाला. आणि इस्त्राएलास ४० वर्षे शांती मिळाली.

आपल्या त्रासात, देवाची स्तुती दु:खांचा आनंदात बदलण्याचे बळ देते.

गिदोनाची उद्धारकाची - सोडविणाऱ्याची भूमिका दर्शविते की देव त्याच्या लोकांनी केलेल्या धाव्यास प्रतिसाद देतो. अतिशय त्रासदायक समयात, आपल्या प्रार्थना देवाला आपली सुटका करण्यास व रक्षण करण्यास एक सहाय्यक पाठविण्यास प्रवृत्त करते.

दु:खात अश्रुपूर्ण नेत्रांनी यशया ४१:१०, **''तूं भिऊ नको, कारण मी तुझ्याबरोबर आहे....''** आणि यशया ४३:४, **''तूं माझ्या दृष्टीने अमोल आहेस; तूं मोठ्या योग्यतेचा आहेत....''** ह्या वचनांकडे वळतो तेव्हा ती सात्वन-समाधान आणि उत्तेजन देतात.

काही वेळा एकटेच प्रवास करीत असताना गैरसोय; अडचण येते आणि आपण चिंतीत होतो, अशा समयी देव शेजारी असलेल्या प्रवाशास आपल्याला मदत करण्यास सांगतो, आणि ती व्यक्ति आपल्याला स्थितीतून सोडविणारी ठरते. दवाखान्यात दाखल झालेलो असताना, देव अनोळखी डॉक्टर किंवा परिचारीकेला

(...पान ९ वर)

## कृपया आमच्या मुख्यालयातील सेवाकार्याकरिता प्रार्थना करा

१. प्रार्थना सेवा : २४ तास
२. बायबलकोर : पत्रव्यवहाराद्वारे अभ्यासक्रम : इंग्रजी, तामिळ आणि हिन्दी
३. एको ऑफ हिज कॉल : मासिक : इंग्रजी, तामिळ, मल्यालम, तेलगु, हिन्दी, कन्नड, मराठी, गुजराथी, बंगाली, ओरिया, नेपाळी, आसामी, पंजाबी, उर्दु, सिंहली आणि आफ्रिकन
४. नहेम्या बायबल कॉलेज (दोन केंद्र) (सायंकालीन / निवासी)
५. पत्रव्यवहाराद्वारे थियॉलॉजीकल अभ्यासक्रम : इंग्रजी आणि तामिळ
६. महान आजापालनाचे भागीदार (पाळकांचे नेटवर्क)
७. प्रशिक्षण कार्यक्रम
८. महासभा
९. छापील साहित्य वाटप आणि पाठ पुरावा
१०. शुभवर्तमान साहित्य मुद्रणालय : प्रकाशने
११. सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कुल : गावातील इंग्रजी माध्यम हायस्कूल
१२. शब्बाथ शाळा : सकाळी ८.३० आणि सायंकाळी ४ वाजता - रविवारी
**१३. तामिळ उपासना : सकाळी ८.०० आणि १०,०० वाजता - रविवारी**
**१४. हिन्दी उपासना : सायंकाळी ४ वाजता - रविवारी**
**१५. तेलगु उपासना : सायंकाळी ५ वाजता - रविवारी**
**१६. इंग्रजी आणि तामिळ उपासना : सायंकाळी ६ वाजता - रविवारी**
१७. स्त्रियांची प्रार्थना : सायंकाळी ५.३० वाजता - बुधवारी
१८. पुरुषांची प्रार्थना : सायंकाळी ७ वाजता - शुक्रवारी
१९. शिष्यत्त्वाची सभा : सायंकाळी ६ वाजता - शनिवारी
२०. गृह प्रार्थना सभा : सायंकाळी ६.३० वाजता - मंगळवारी/गुरुवारी
२१. विशेष प्रभु भोजन : पहाटे ६ वाजता प्रत्येक महिन्याच्या १ल्या दिवशी
२२. सेवाकाची समालोचन सभा : सायंकाळी ५.३० वाजता - पहिला शनिवार
२३. पालकांची प्रार्थना : सायंकाळी ४ वाजता - पहिला रविवार
२४. रात्रभर प्रार्थना : सकाळी ९.३० वाजता - दुसऱ्या शुक्रवार
२५. उपास प्रार्थना : सकाळी ९.३० वाजता - तिसऱ्या शनिवार
२६. पवित्र सहभागिता : दुसऱ्या रविवारच्या उपासनेत
२७. सकाळचे मनन : पहाटे ५ वाजता - दररोज
२८. कार्यालयीन स्टाफचे मनन : सकाळी ९ वाजता - दररोज
२९. कार्यालय : सकाळी ९ ते रात्री ९ पर्यंत (रविवार वगळून)

## एको ऑफ हिज कॉल टपाल द्वारे अभ्यासक्रम

### १) बायबलकोर

आम्ही नवीन ख्रिस्ती विश्वासणारे आणि अन्य विश्वासातील लोकांकरिता टपालाद्वारे बायबल मधील पायाभूत सत्यांवर इंग्रजीत ५७ पाने, हिन्दी ७६ पाने आणि तामीळमध्ये ९६ पानांचा अभ्यासक्रम देऊ करीत आहोत. तुम्हाला 'न्यु लाईफ फॉर यू' या शिर्षकाचे अभ्यासक्रमाचे पुस्तक देण्यात येईल! **अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर, तुम्हाला प्रमाणपत्र दिले जाईल. अभ्यासक्रमाकरिता आवश्यक अशी फी आकारली जाणार नाही. तुम्ही आशीर्वादित व्हाल!**

### २) टपालाद्वारे ईश्वर विज्ञान आभ्यासक्रम

हा अभ्यासक्रम सुवार्तिक, ख्रिस्ती पुढारी आणि अरिक्षित सभासद ज्यांना देवाची सेवा करण्याची तीव्र इच्छा आहे, अशा करिता इंग्रजीत ५३७ पानांचा आणि तामिळ भाषेत ६५२ पानांचा अभ्यासक्रम उपलब्ध आहे. अभ्यासक्रमाची १००० रुपये फी आकारली जाते. त्यामध्ये १४९ अध्याय/पाठ समाविष्ट असलेली एकूण ७ पुस्तके देण्यात येतील. '**सर्टफिकेट इन मिनिस्ट्री**' प्रमाणपत्र देण्यात येईल. देव तुम्हाला आशीर्वाद देईल!

***अधीक माहिती करिता आम्हाला लिहा -***

**अध्यक्ष - नहेम्याह बाईबल कॉलेज**

Echo of His Call, Post Box 2957
CHEPAUK, CHENNAI - 600 005.
Ph.: (044) 2852 8282, 2852 9293, 2854 7766,
Cell : 98410 71852, 95661 31858
E.mail : biblecor@yahoo.co.in

## एको ऑफ हिज कॉल

### मासिक (विनामुल्य) मिळविण्याची उत्तम संधी

तुम्ही तुमच्या मित्रांचे/नातेवाईकांचे पत्ते आमच्याकडे पोस्टाद्वारे, पत्राद्वारे, ई.मेल, वॉटस् ॲप किंवा फोन द्वारे पाठविल्यास, आम्ही त्यांना त्यांच्या पत्त्यावर मासिक विनामुल्य पाठवित जाऊ.

## कर सवलत

**एको ऑफ हिज कॉल एज्युकेशनल ट्रस्ट**ला भारतातील कोणत्याहि एका व्यक्तिद्वारे किंवा संस्थाद्वारे देण्यात येणारी देणगी हि आयकर कायद्याच्या ८० जी कलमा अंतर्गत कर सवलतीस पात्र ठरते. कृपया आपली देणगी डी.डी./धनादेश/मनी आर्डर "**एको ऑफ हिज कॉल एज्युकेशनल ट्रस्ट**" च्या नावाने खालील तपशीलानुसार आम्हाला पाठवा

| | |
|---|---|
| **Account Name** | **: ECHO OF HIS CALL EDUCATIONAL TRUST** |
| **Account Number** | **: 1023 2923 805** |
| **Bank Name** | **: STATE BANK OF INDIA** |
| **Branch** | **: TRIPLICANE, CHENNAI - 600 005** |
| **IFSC Code** | **: SBIN 0000249** |
| **SWIFT Code** | **: SBI NIN BB 455** |



# खड्ड्यातून महालापर्यंत

## PIT TO PALACE

**''नाचणाऱ्याने हे ध्यानात आणावे !'' (मत्तय २४:१५)**

**(पास्टर एस. सॅम सेलवाराज यांच्या जीवनातील अनुभव)**


**''तूं आपला भार परमेश्वरावर टाक म्हणजे तो तुझा पाठिंबा होईल.''**
**(स्तोत्र ५५:२२)**

प्रारंभी माझा ख्रिस्ती धर्माला विरोध असताना देखील १९६९ सालात अचानक माझ्या जीवनाला कलाटणी देणारी येशू ख्रिस्ताशी गांठ पडली. या अनुभवामुळे माझे तारण झाले, ज्यामुळे माझे जुने मित्र ज्यांनी मला इजा करण्याचा प्रयत्न केला, त्यांच्या व माझ्या मैत्रित तडा गेला. देवाने मला जणू मी त्याच्या डोळ्यांचे बुबुळ असल्याप्रमाणे रक्षण केले.

देवाकडून अनेक अभिवचने घेऊन मी १९७१ साली चेन्नईला आलो. चेन्नाईतील माझा पहिला दिवस मजकरीता एक आव्हान होते. माझी कोणाशीही तोंड ओळख देखील नव्हती, त्यामुळे एक रात्र रस्तावर काढण्याची पाळी आली. भितीमुळे रात्रभर जागाच होतो.

साधारण: पहाटे २ वाजण्याच्या सुमारास दोन पोलीस अधिकारी माझ्या जवळ आले व माझ्या परिस्थितीबद्दल चौकशी करू लागले. त्यांना मी माझ्या कुटुंबाबद्दलची पार्श्वभुमी व प्रभु येशूने माझ्या जीवनात कसा बदल केला हे सांगितले. त्यांना माझ्या बोलण्यात काही चुक आढळली नाही, त्यामुळे मी रात्रभर रस्त्यावर असण्याबद्दलचे कारण विचारीले. दोघा अधिकाऱ्यापैकी एकाने दुसऱ्या अधिकाऱ्याला मला पोलीस चौकीत घेऊन चलण्याविषयी सुचविले, त्यावर दुसऱ्या अधिकाऱ्याने शेरा मारला की मी प्रतिष्ठित कुटुंबातील असल्याचे वाटत आहे.

त्यानंतर त्याने मजकडे पाहून म्हटले, ''आमच्या सोबत चल.'' त्यांनी मला त्यांच्या सोबत पोलीस चौकीत नेले आणि इतर पोलीस खात्यात काम करणाऱ्यांचा बाजूला असलेल्या गॅरेजमध्ये माझी राहाण्याची सोय केली. त्याने माझ्या सुखसोईची खात्री करुन घेतली आणि म्हटले, ''जो कोणी चांगले जीवन शोधीत असतो त्याच्यासाठी हि जागा सुरक्षित आणि योग्य अशी आहे जरी मला त्याचा स्त्रोत आनिश्चित आहे, तरी तुला मदत करावी अशी माझ्या मनात उत्कट इच्छा वाटते आहे.'' त्याने आणखीन त्यात भर घातली, ''या गॅरेजमध्ये दररोज रात्री एक सर्प येत असतो. त्याने आतापर्यंत कोणालाही इजा केली नाही. त्यामुळे घाबरण्याचे कारण नाही, शांत रहा, तुला मार्गदर्शन करणारी शक्ती तुझे रक्षण करील.'' त्यानंतर त्या पोलीस अधिकाऱ्याची आणि माझी भेट झाली नाही.



पहाट होत असताना, मला असे वाटले, मी निराधार असा एका खड्यात वाघाला सामोरे जावे अशा भितीने पकडीत होतो. दररोज सर्प या गॅरेजमध्ये भेट देत असतो हे समजल्यामुळे, मी एका ग्लासात पाणी घेतले, प्रार्थना केली आणि ''येशू ख्रिस्ताच्या रक्तात विजय'' असे उच्चारत गॅरेजमध्ये सर्वत्र पाणी शिंपडले. विलक्षण बाब म्हणजे माझ्या गॅरेजमधील वास्तव्याच्या काळात मच्छर किंवा सर्प यापैकी काणाचाही प्रवेश झाला नाही. जणू तो सुरक्षित असा स्वर्ग आहे.

गॅरेजमधील माझ्या वास्तव्याच्या काळात मी अनेक पोलीस अधिकाऱ्यांशी मैत्री जोडली. त्यांनी उघडपणे मजजवळ त्यांची धडपड व्यक्त केली, आणि माझ्या प्रार्थनेमुळे अनेकांना त्यांच्या समस्यांबद्दल उत्तर मिळाले आणि त्यांनी येशू ख्रिस्ताचा त्यांचा तारणहार म्हणून स्विकारले देखील. त्या जागेत दैवी उपस्थिती होती आणि परिणामी माझी अतिशय उत्तम रीतीने काळजी घेतली जात होती, मला सन्मानाने वागविण्यात येत होते आणि मला अवर्णनीय असा आनंद आणि संरक्षण अनुभविण्यास मिळत होते.

त्यानंतर देवाने मला एका दुसऱ्या ठिकाणी नेले व एक भाड्याचे घर मिळवून दिले. देव परोपकारी आहे. जे आपल्या प्रभुमध्ये विश्वास प्रकट करितात त्यांना कशाचेही उणे पडत नाही. येशू ख्रिस्त काल, आज आणि सर्वकाळ नबदलणारा असा आहे. तो तुमच्या जीवनात देखील अद्भूत चमत्कार कृत्ये घडवून आणील.

*माझ्या ओसाड प्रदेशातील प्रवासाने जेव्हा मी दमतो,*
*माझ्या जिवलगाचा आवाज माझे सांत्वन आणि आशीर्वाद देताना ऐकु येतो.*
*तांबडा समुद्र जरी माझ्या विरुद्ध उभा राहिला,*
*देव मला वाचविल आणि मार्ग दाखविल.*
*तो निश्चितच सुटका करील आणि नवीन शक्ति पुरविल,*
*माझ्या सर्व शत्रूंचा पराभव आणि नाश करण्यास.*

❀❀❀❀❀❀

(पान ६ वरुन)
आपली प्रेमाने मदत करण्यात पाठवितो ह्या व्यक्ति देवाने पाठविलेल्या उद्धारक-सोडविणाऱ्या अशा असतात. आपल्यापैकी अनेकांनी आपल्या जीवनात अशी दैवी मध्यस्ति अनुभविली असणार.

देव आपल्या उजवीकडे सावलीसारखा येऊन आपले रक्षण करितो. जे प्रामाणीकपणे त्याजकडे पाहतात ते प्रकाशीत होतात. आपण चुकलो तर त्या मान्य करून देवाशी समेट करुन सद्सद् विवेकाकडे लक्ष द्यावे.

मोशेच्या पूर्वीचा काळ हा सद्सद्विवेकने स्पष्ट होत असते. आणि देवाने आपल्याला धार्मिक जीवन जगण्यासाठी मार्गदर्शनाकरीता मोशेच्या द्वारे नियम व आज्ञा दिल्या.

**आता योनाच्या गोष्टीतून शोध घेऊ या**

## ४. योना

बायबलमधील योना, या प्रेषिताला देवाने निनवे शहरात जाऊन तेथील लोकांना त्यांच्या पापाबद्दल ताकीद देण्याचे काम नेमून दिले. आज्ञा न मानता, योना तार्शिसास जाणाऱ्या जहाजात जाऊन बसला आणि पुढे समुद्रात मोठे तुफान आले. योना परमेश्वराची आज्ञा न पाळता पळून चाललेला हे जहाजातील लोकांना कळले, त्यांनी त्याला उचलून समुद्रात फेकून दिले. परमेश्वराने योनाला गिळण्यास एक प्रचंड मत्स्य सिद्ध केला. तो मत्स्य त्याचा उद्धारक सोडविणारा झाला.

आतापर्यंत सुटका करणाऱ्या ज्यां सर्वां विषयी आपण पाहिले; त्यांनी जे, देव नसलेल्या - देवाला न मानणाऱ्या अधिकाऱ्यांच्या जाच सहन करणाऱ्या आणि आज्ञापालन न केल्यामुळे परिणाम भोगत असलेल्या लोकांची सुटका केली. सर्व सुटका करणारे त्यानंतर मृत्यु पावले आणि त्यांना पुरण्यात आले, सरतेशेवटी देवाने त्याचा पुत्र येशू ख्रिस्त याला, मानव रुपात पाठविले. येशू, पापरहीत असताना क्रुस घेतला. फटके सहन केले, रक्त सांडिले आणि त्याला क्रुसावर खिळण्यात आले, त्याने आपल्या पापांकरिता त्याचा प्राण अर्पण केला. तिसऱ्या दिवशी मेलेल्यातून उठून आज आम्हामध्ये रहात आहे, मार्गदर्शन करीत आहे, चुका सुधारीत आहे आणि आपण कमी पडलो. तरी आमचे स्वर्गात पोहचे पर्यंत रक्षण करीत आहे. त्याची रिकामी कबर अनंतकालीक जीवनाचे प्रतिक आहे.

आपण चुका करीत असताना देखील, येशू ख्रिस्त आपला उद्धारक-तारणारा, आपले मार्गदर्शन करितो, सुधारतो, आणि रक्षण करितो, त्याच्या इच्छेनुसर चालवितो आणि आपण स्वर्गात पोहचेपर्यंत आपल्यावर लक्ष ठेवितो.

मी सर्व प्रिय वाचकांना एक महत्त्वाचा संदेश देवू इच्छिते, "**देवाजवळ या म्हणजे तो तुम्हांजवळ येईल...**" (याकोब ४:८).

याशिवाय जे त्याला प्रामाणिकपणे अनुसरत आहेत आणि आज्ञापालन करीत आहेत त्या सर्वांना विशिष्ट आशीर्वाद देण्याचे ठरविले आहे. "**मी तुम्हांस खचीत सांगतो, पुनरुत्थतीत मनुष्याचा पुत्र आपल्या गौरवाच्या राजासनावर बसेल, तेव्हां माझ्यामागे चालत आलेले तुम्हीही बारा राजासनावर बसून इस्त्राएलाच्या बार वंशाचा न्यायनिवाडा कराल.**" (मत्तय १९:२८) असे विलक्षण आश्वासन दुसऱ्या कोणाला प्राप्त होईल?

या पापी जगात व्यक्तिगत रित्या पापात जन्मलेले असल्यामुळे आपण या तारणाऱ्याच्या मागे चालिले पाहिजे जो आपल्याला पावित्रतेत बदलतो भविष्यात त्याच्या बाजूला राजासनावर बसून न्यायाधीशाप्रमाणे जीवन जगण्याचा दृष्टिकोन समोर ठेवून त्याच्यासाठी पवित्रतेत जीवन जगूया.

स्वत:ला समर्पित करु या आणि या असामान्य जीवनाकरिता योग्य ठरु या. "ज्याने तुम्हांस पाचारण केले तो पवित्र आहे, तसे तुम्हीही सर्व प्रकारच्या आचारणांत पवित्र व्हा." (१ पेत्र १:१५). "**मी पवित्र आहे यास्तव तुम्ही पवित्र व्हा.**" (१ पेत्र १:१६).

देव तुम्हाला आशीर्वाद देवो व तुमचे मार्गदर्शन करो. आमेन!


# URGENT

We require approximately 1000 Hindi Christian books for **our Nehemiah Bible Colleges**. Kindly inform us about the possibility of obtaining theological Hindi books.

**Please stop sending books in English and Tamil languages.** Thank you.

- Pr. S. Sam Selva Raj, Editor
+91-98412 71858

# URGENT NEED

**PRINCIPAL & TEACHERS**

**for**

**ST. PAUL'S MATRICULATION SCHOOL,**

**An *Echo of His Call* Institution**

**Vijayanagaram, Medavakkam, Chennai - 100.**

We need well qualified, experienced, dedicated, hard working and mission oriented Christians.

Apply with Bio-data to
E.mail: sam@echoofhiscall.org
WhatsApp: (+91) 98412 71858

# WANTED for

**NEHEMIAH BIBLE COLLEGE of ECHO OF HIS CALL, Chennai**
(ATA - Registered Candidate for Membership)

**DEAN (Residential):**
Hindi Theologian with M.Div. / M.Th. Degree & experience. Boarding, Lodging and Salary will be paid.
Eligible candidates may send bio--data to:
E.mail: sam@echoofhiscall.org
WhatsApp: (+91) 98412 71858

RNI NO. 70106/98, Postal Regn. No. TN/CH/(C)/206/24-26 WPP NO. TN/PMG(CCR)/WPP-261/24-26

## एको ऑफ हिज कोल

**यु ट्युब सबस्क्राईब करा**

जेव्हा तुम्हाला वेळ मिळेल तेव्हा कृपा करुन आमच्या **एको ऑफ हिज कॉल यु ट्युब चॅनल** बघा व सबस्क्राईब करा. धन्यवाद

**- संपादक**

## OUR BANK DETAILS:

***1. Bank : State Bank of India***

Branch : **Triplicane, Chennai-5**
Name : **S. Sam Selva Raj**
A/C No. : **1023 2934 679**
IFSC : **SBIN 00 00 249**
SWIFT CODE : **SBI NIN BB 455**

***2. Bank : ICICI Bank***

Branch : **Anna Salai, Chennai-6**
Name : **Echo of His Call**
A/C No. : **6038 0502 2319**
IFSC : **ICIC 000 6038**

***3. Bank : State Bank of India***

**(This Account is for Tax Exemption for Indians only )**

Branch : **Triplicane, Chennai-5**
Name : **Echo of His Call Educational Trust**
A/C No. : **1023 2923 805**
IFSC : **SBIN 00 00 249**

**Google Pay: 98410 71858**
**PayPal : SAM SELVA RAJ**

*****

**E.mail : sam@echoofhiscall.org**

# ECHO OF HIS CALL

१७ भाषेत मासिक, बायबल कॉलेज पत्रव्यवहाराद्वारे अभ्यासक्रम मंडळी रोपन कार्य. गावात इंग्रजी माध्यम शाळा, शुभवर्तमान साहित्य मुद्रणालय, महासभा, शिबीर, सामाजिक सेवा इत्यादि.

**वार्षिक वर्गणी : रूपये १००/-  आजीवन वर्गणी : रूपये २०००/-**

एको ऑफ हिज कॉल मिनिस्ट्रीजची विविध सेवा कार्ये तुमच्यासारख्या स्वेच्छा दान आणि देणग्या देणाऱ्या देवाच्या लेकरांनी दिलेल्या आधाराद्वारे करण्यात येतात. या सेवाकार्याकरिता देव तुम्हाला सुचवेल तशा प्रकारे तुम्ही आधार देवू शकता. शुभवर्तमान न पोहंचलेल्या लोकांपर्यंत ते नेण्याकरिता व मंडळ्या रोपन कार्याकरिता आम्हांला तुमच्या मदतीची गरज आहे.

एको ऑफ हिज कॉल मासिक तुम्हांला नित्य नियमाने मिळावे अशी तुमची इच्छा असेल तर कृपया आम्हाला लिहून कळवा. तुमचा पोस्टाचा किंवा ई-मेलचा पत्ता बदलला असेल तर कृपया जुना व नवा पत्ता आम्हांला कळवा.

आमच्या वेब साईटवर देखील १७ भाषेतील मासिक उपलब्ध आहे. तुम्ही साईट वर जाऊन ते वाचू सकता व डाऊन लोड देखील करून आशीर्वादित होऊ शकता.

Your letters, prayer requests and your financial helps **(Money Orders, Cheques or Demand Drafts, NEFT, PayPal (Sam Selva Raj, sam@echoofhiscall.org) PhonePe (98410 71858), Gpay (98410 71858), Western Union, MoneyGram, etc.)** to **ECHO OF HIS CALL** may please be sent to the address below.

आम्हांला आमची यादि अद्यावत करण्याकरिता कृपया तुमचा घरचा फोन मोबाईल फोन क्रमांक आणि ई.मेल कळवा.

Our address :

**ECHO OF HIS CALL**
10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA
PH: (+91-44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766/ Cell: (+91) 98410 71852, 95661 31858 / E.mails: sam@echoofhiscall.org / biblecor@yahoo.co.in
Websites: www.echoofhiscall.org / www.stpaulsmatriculation.com

**YOU CAN SEND YOUR DONATIONS BY ONLINE ALSO**

RNI NO. 70106/98
**Postal Regn. No. :TN/CH/(C)/206/24-26**
**WPP NO. TN/PMG(CCR)/ WPP- 261/24-26**
**Date of Publication: Second week of every month**
**Date of Posting : 11th & 12th of every month**
**Posted at "Egmore RMS / 1 Patrika Channel"**
**on 12th APRIL 2024**
**If un-delivered please return to:**
**ECHO OF HIS CALL (MARATHI)**
**P.O. Box No. 2957,**
**Chepauk, Chennai - 600 005, INDIA.**
**Phone: (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766**

***JESUS LOVES YOU!***

**To**

*GOD BLESS YOU!*

Owned and published by **S. Sam Selva Raj** from New No. 8 & 10, Old No.18 & 19, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk, Chennai-600 005 and printed by **S. Sam Selva Raj** at **Echo of His Call Printers,** New No. 8 & 10, Old No.18 & 19, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk, Chennai-600 005. Editor: **S. Sam Selva Raj.**